# महाराष्ट्र परावैद्यकीय परिषद,मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला,सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार,
पी.डीमेलो रोड,फोर्ट,मुंबई -४०० ००१दुरध्वनी क्र.९१-२२-२२६२०३६०
ई-मेल आयडी -mpmcmumbai2017@gmail.com
वेबसाईट -www.maharashtraparamedicalcouncil.org


---

क्र . मपवैप /नोटीस /नोंदणीपुर्व / २०० /२०१८ दि.१३.११.२०१८

## नोटीस

महाराष्ट्र परावैद्यक परिषद, मुंबई

महाराष्ट्र परावैद्यक परिषद अधिनियम २०११ दि .३० जानेवारी २०१६ व शासन अधिसुचना क्र. परावै/ ०६१७/प्र. क्र. १४९/अधिनियम / वै.शि व औ. द्र. वि. मंत्रालय, मुंबई, दि.१८ ऑक्टोबर २०१७ नूसार स्थापन झाली असून अधिनियमातील कलम २६ नुसार महाराष्ट्र राज्यातील परावैद्यक व्यवसायी व्यक्तींची नोंदणी करण्याची कारवाई सुरु करण्यापूर्वी अधिनयमासोबत जोडलल्या अनुसुचीमधे विनिर्दिष्ट केलेली शासनमान्य कोणतीही परावैद्यक अर्हता धारण करणाऱ्या आणि परावैद्यक व्यवसायी व्यक्ती म्हणून व्यवसाय करण्याची इच्छा असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस अश्या शासनमान्य अर्हतेच्या पुराव्यासह प्रंबधकाकडे ऑनलाईन द्वारा विहीत नमुन्यात प्रमाण पत्राची पडताळणी करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित नमुना या परिषदेच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदर प्रकीया दिनांक २१ नोव्हें. २०१८ पासुन सुरु करण्यात येत आहे.

नोंदणीपूर्व प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी महाराष्ट्र राज्यामधुन अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसुचीमधील शैक्षणीक परावैद्यक अर्हता उत्तीर्ण केलेल्या प्रत्येक कोर्ससाठी रू २०००/- (रु . दोन हजार ) प्रमाणपत्र पडताळणी शुल्क आकारण्यात येईल.सदर शुल्क आवेदन पत्रासोबतच ऑनलाईनद्वारा जमा करण्यसात यावे व शुल्क भरल्याची पावती आवेदन पत्रासोबत जोडण्यात यावी. प्रमाणपत्र पडताळणी शुल्क हे नापरतावा शुल्क असेल. ऑनलाईन अर्ज भरुन त्यासोबत प्रमाणपत्र स्कॅन करुन पाठविण्यात यावे. त्यानंतर ऑनलाईन केलेल्या अर्जाची प्रींट काढून सर्व नमुद प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती व ऑनलाईनद्वरा भरलेल्या शुल्काच्या पावतीसह सदर अर्ज हस्तबटवडा/टपाल/ कुरीयरद्वरा प्रबंधक महाराष्ट्र परावैद्यक परिषद, मुंबई यांचेकडे त्वरीत पाठविण्यात यावा. विनाशुल्क आणि विनाप्रमाणपत्र असलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत किंवा त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

नोंदणीपुर्व प्रमाणपत्र सत्यतेची पडताळणी पूर्ण झालेल्या अर्जदारास नोंदणीसाठीचा विहीत अर्ज भरुन परिषदेस पाठविण्यासाठी ई-मेल द्वारे कळविण्यात येईल.

(रमेश जंजाळ)
प्रबंधक

Scanned by CamScanner